| MHKO050000942012 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२६/२०१२ मधील निशाण २५३ खालील आदेश</u>** | **चंद्रकांत महादेव नाईक (म.वा.)<br>वि.<br>कृष्णराव तात्यासो नाईक, वगैरे** |
|---|---|---|

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत वादी क्र.२ चंद्रकांत नाईक यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रमांक २ चंद्रकांत महादेव नाईक हे दि. २८/०९/२०१८ रोजी मयत झाले आहेत. तथापी प्रस्तुतचे संपूर्ण काम वादींचे वतीने श्री. सदाशिव नाईक हे पहात होते. त्यामुळे वादी नं. २ च्या वारसांना कोर्टातील कामाची माहीती नव्हती. वादी नं. १ हेच कोर्टाचे सर्व कामकाज पहात असलेने व ते ही मयत झाल्याने कामाची माहीती मिळणेस विलंब झाला. वादी यांनी जाणुन बुजून विलंब केलेला नाही. सबब वादी यांनी वादी नं. २ यांचे वारस रेकार्डवर आणणेस झालेला एक वर्षे पंधरा दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, कामास विलंब करण्याच्या हेतूने विलंब केला आहे. अर्जात कोणतेही ठोस कारण नाही. सबब अर्ज नामंजूर करणची विनंती केली आहे.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १३/०१/२०२० रोजी दाखल केला असून वादी यांनी मयत वादी नं. २ चंद्रकांत महादेव नाईक यांचा मृत्यु दाखला प्रस्तुत कामात नि. २५७ सोबत दाखल केला आहे. दावा अंतिमरित्या चालवून निकाली करण्यासाठी सर्व पक्षकार हे दाव्यात सामील असणे आवश्यक आहेत. त्यामुळे सर्व वारसांना पटलावर घेणे आवश्यक आहे. उलटपक्षी वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दावा अंतिमरित्या चालवून निकाली होणेसाठी मदतच होणार

आहे. त्यामुळे वाद नं. २ चे वारसांना वारस रेकार्डवर आणणेस झालेला विलंब माफ करणे उचित ठरेल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. नि. २५३ कडील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी क्रमांक २ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.07.12 16:54:53 +0530

**इचलकरंजी**
**दिनांक–११/०७/२०२४**

**(संजय दि. वानखेडे)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**